# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार

कामगारांच्या कल्याणासाठी किमान २५ वर्षे समर्पित वृत्तीने कार्य करणा-या व्यक्ती / संस्थाना सदर पुरस्काराने गौरविले जाते. सदर पुरस्कारासाठी संबंधितांकडून अर्ज मागविले जात नाहीत. समाजातील विविध मान्यवर, उद्योग संस्था, कामगार संघटना यांच्याकडून संबंधित व्यक्ती / संस्थांची विहित नमून्यात माहिती मागविली जाते. प्राप्त माहितीतून गुणवत्तेनुसार पुरस्कारार्थी संस्था व व्यक्तीची निवड केली जाते. सन २००० पासून मंडळ हा पुरस्कार प्रदान करीत आहे.

**पुरस्काराचे स्वरुप :**

रु.५१,०००/- (व्यक्ती / संस्था), स्मृतीचिन्ह व मानपत्र.

**सर्वसाधारण नियम व अटी :**

- पुरस्कारासाठी नाव सूचविताना सदर व्यक्तीचे वय ५० वर्षाहून कमी नसावे. पुरस्कारासाठी ज्या संस्थेचे नाव सूचविण्यात येईल ती संस्था नोंदणीकृत असावी.

- व्यक्ती/संस्था यांनी कामगारांसाठी किमान २५ वर्ष कार्य केलेले असले पाहिजे. संस्थेची नोंदणी किमान २५ वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.

- कामगारांमध्ये कुटुंब नियोजन, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, प्रौढ साक्षरता, एड्स आदी विषयांबाबत जनजागृती करणे. कामगार पाल्यांसाठी शाळा-अभ्यासिका सुरू करणे, विविध स्पर्धा-उपक्रमांचे आयोजन करणे, सहकारी गृहनिर्माण संस्था उभारुन कामगारांना घरे मिळवून देणे आदी क्षेत्रात भरीव स्वरुपाचे लेखनाव्दारे वा कृतीशीलपणे योगदान देणाऱ्या व्यक्ती / संस्था यांचा पुरस्कारासाठी विचार केला जातो.

- लोकशाही जीवन, जाणिवांचा विकास, राष्ट्रीय एकात्मता, महिला, अपंग, मागसवर्गीय कामगार तसेच समाजातील दुर्बल व वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी संवैधानिक मार्गाने कार्य करणा-या व्यक्ती व संस्था यांचा पुरस्कारासाठी विचार केला जातो.

- राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणणा-या जातीयवादी तसचे संकुचित विचारांच्या आणि राज्य घटनाविरोधी वर्तन असणा-या व्यक्ती वा संस्थेचा विचार या पुरस्कारासाठी करता येणार नाही.